REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2021

# दलित साहित्यातील धर्म, जात व लिंग आधारित विषमतेचे चित्रण: एक चिंतन

स्वाती मनोहर काळे[1] , अर्चना अनिल गंगावणे[2], प्रा. डॉ. प्रभाकर कांबळे[3]
[1]संशोधक विद्यार्थीनी
[2]संशोधक विद्यार्थीनी
[3]मराठी विभागप्रमुख आदर्श महाविद्यालय, उमरगा.

## प्रस्तावना:



विवेकवादी व विज्ञानवादी विचारधारेतून मानवी समाजाची जडणघडण कालपरत्वे होत आलेली आहे, त्यातून सामाजिक सुधारणे बरोबरचं राजकीय, आर्थिक, धार्मिक मनोवृत्तीमध्ये सुधारणा करण्याबरोबरचं परिवर्तनवादी विचारधारा भारतीय समाजव्यवस्थेमध्ये निर्माण करण्याचे कार्य त्या त्या कालखंडातील विचारवंत मंडळीनी आणि समाज सुधारकाच्या वैचारिक प्रेरणातून प्रेरित होवून मानवी समाजजीवनाच्या आणि मानवीमूल्याच्या उध्दाराची आणि विकासाची चळवळ निर्माण झालेली आहे. त्यातून सामाजिक, राजकीय, आर्थिक, व धार्मिक मूल्यातील शाश्वत मूल्याची जोपासना करतानाच त्याविषयी अभिव्यक्ती भारतीय साहित्याबरोबरचं मराठी साहित्यातून कालपरत्वे अभिव्यक्त झालेली आहे.

कोणत्याही भाषेतील साहित्याच्या निर्मीतीतूनच त्या त्या देशाची सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि वैचारिक मंथनातून व्यक्त झालेली असते हे आपल्याला नाकरता येत नाही. भारतामध्ये अनेक समाजसुधारक आणि विचारवंत मंडळी निर्माण झालेल्या आहेत,त्यामध्ये महामानव,बोधीसत्व, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगादान अंत्यत महत्वाचे आहे.हजारो वर्षे पासून अज्ञानाच्या अंधकारामध्ये जीवन जगणा-या दलित समाजाला माणूस म्हणून जगण्याची जाणीव निर्माण करण्याचे तसेच स्वांतत्र्य,समता,बधुत्व या तत्वमूल्याची जाणीव करून देण्याचे फार मोठे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केलेले आहेत. त्यांच्या प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मीती झालेली आहे.

## दलित साहित्यः

भारतीय साहित्य विश्वात दलित साहित्याचे योगदान महत्वाचे आहे. दलित साहित्याला आंबेडकरवादी साहित्य, विद्रोही साहित्य म्हणून गौरविले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या वैचारिक क्रांतीतून दलित साहित्याची आणि दलित चळचळीची जडणघडण झालेली आहे.साहित्य निर्मीती ही व्यक्तीनिष्ठ कला असली तरी समाजातील किंवा तत्कालीन मानवी समुहातील विविध भावभावना, घटना, प्रंसग त्यांचे कौटुबिक, सामाजिक जीवनप्रणाली साहित्यकृतीतून अभिव्यक्त होत असते. त्यामुळे दलित साहित्याच्या निर्मीती ही व्यक्तीनिष्ठ स्वरूपाची असली तरी सामाजिक जीवनपध्दती त्यांतून व्यक्त झालेली आहे. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेमुळे दलित साहित्यातून व्यक्त झालेली आहे. म्हणून दलित साहित्य हे विद्रोही साहित्य आहे.हे समीक्षकानी मान्य केल्याचे दिसून येते दलित साहित्यामध्ये व्यथा, वेदना आणि विद्रोह या तत्वमूल्याना अत्यंत महत्व आहे. धर्मातील पाखंडी, कर्मठरूठी पंरपरेमुळे दलित मानवीसमुहाला किती भयानक स्वरूपाचे दु:ख, व्यथा, वेदना सहन

कराव्या लागत होत्या यांचे वास्तववादी प्रखर विवेचन दलित साहित्यातील साहित्यीक मंडळीनी अभिव्यक्त केलेले आहेत. दलित साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या वैचारिक क्रांतीतून निर्माण झालेले मानवतावादी साहित्य आहे. असे मला प्रामाणिकपणे वाटते दलित साहित्यामध्ये कथा, कांदबरी, कविता, नाटक चरित्र, आत्मचरित्र, या साहित्य प्रकाराची निर्मीती केलेली आहे. या सर्व साहित्यप्रकारातून वर्णव्यवस्थेमुळे, जातीव्यवस्थेमूळे, व वंशवादामुळे दलित समाजाची शोकांतिका कसी झाली आहे.यांचे प्रत्ययकरी चित्रण साहित्यकृतीतून व्यक्त झालेले आहे. धर्म माणसासाठी आहे का? माणूस धर्मासाठी आहे? या यक्षप्रश्नाच्या स्वभोवती निर्माण झालेल्या वैचारिक प्रगलभेतून सामाजिक सुधारणेविषयी चळवळ आणि साहित्यकृती निर्माण झाल्याचे दिसून येते. म्हणून धर्म, जात, वंश आणि लिंग या विचारधारेची वैचारीक भूमिकेतून विवेचन आणि चिकिसा करणे अत्यत महत्वाचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी धर्म, जात, आणि वंश परंपरेमूळे दलित समाजातील लोकांचे माणूसपण नाकारले म्हणून हिंदू धर्माचा त्याग करून बौध्द धर्माचा स्वीकार केलेले आहेत. म्हणून दलित साहित्यात माणुसकीचे श्रेष्ठत्व साहित्यकृतीमुळे अभिव्यक्त केलेले आहेत.

जातीविषयी डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात की, “जात ही जाणीव कशी जाग्रत असते व सामाजिक व राष्ट्रीय भावनेला कशी मारक ठरते याची सुसुत्र मांडणी बाबासाहेबानी केली आहे."....1

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी जातीव्यवस्थेमुळे हजारो वर्षांपासून दलित समाज गुलामगिरीमध्ये जीवन जगत आलेला आहे. जातीमुळे जातीयता समाज मनात निर्मीत होते त्याचा विघातक परिणाम समाजव्यवस्थेवर आणि राष्ट्रीय ऐक्य भावनेवर होत असतो. त्यामुळे स्वांतत्र्य, समता, बंधुत्व ही तत्वमूल्ये भारतीय समाजव्यवस्थेत रूजविण्याचे अलैकिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केलेले आहेत. म्हणुन भारतीय राज्यघटनेचे आणि भारतीय समाजसुधारणेचे शिल्पकार आहेत.हे आपल्याला नाकारता येत नाही.

दलित साहित्याचे गाढे अभ्यासक आणि विचारवंत डॉ.गंगधर पानतावने यांनी वंशवादविषयी आपली भूमिका माडताना म्हणतात की, "जॉन हॉवर्ड ग्रिफीश अनुभव वंशवादाचे बळी असलेल्या निग्रो मरणावस्था त्यानं भोगावी म्हणुन तो म्हणाला काही माणसं काही माणसचं आयुष्य बरबाद करतात हे माझ्या एका निग्रो मुलीला विचारण्यात आल होतं. ज्यूंचा नरसंहार करणा-या जगजेतेपणाची स्वप्न पाहणा-या हिटलर वर शिक्षा द्यायची झाली तर कोणती शिक्षा देशील? ती चटकन म्हणाली होती, हिटलरला एकच शिक्षा द्या त्याला फक्त एकच दिवस निग्रो करा.निग्रोच्या म्हणजे शारीरिक आणि मानसिक छळ ग्रिफीश याच अवस्थेतून गेला”...2

वरील मनातून दक्षिण आफ्रिकेतील 'निग्रो' लोकांना गुलामगिरीचे किती भयानक स्वरूपाचे जीवन जगावे लागत होते तसेच भारतातील दलित समाजाला अतोनात स्वरूपाचा छळ सहन करावा लागलेला होता या गुलामीमधून मुक्त करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केलेले आहेत. तसेच दक्षिण आफ्रिकेमध्ये नेल्सन मंडेला या महामानवानी केलेले आहेत.त्याविषयी कविसत्री हिरा बनसोडे म्हणतात की,

“नेल्सन मंडेला
दक्षिण आफिकेचा क्रांतासूर्य
डोगंराची छाती फोडावी तसेच
गुलामावर प्रहार करीत गो-याच्या वर्चस्वावर
विजांच्या आसुड फटकारीत
तु निघालास दाही
दिशा पेटवीत
यात मंडेला, फुले, आंबेडकर सारखा
तु जिगरबाज निघालास बहाद्रा".....३

सूर्यावर थंकणा-या या वळवळणा-या किडयांन टाचे खाली चिरडतच महापुष तेजाचा मार्ग चालतात." कवियत्री हिरा बनसोडे यांनी धर्म, जात, आणि वंशवादामुळे भारतातील दलित समाज, दक्षिण आफ्रिकेतील आणि निग्रो लोकांनी गुलामाप्रमाने जीवन जगावे लागत होते हे वास्तव व्यक्त करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि नेल्सन मंडेला या दोन्ही महापुरूषानी केलेल्या कार्याची यशोगाथा व्यक्त केलेल्या आहेत.त्याच्या कार्यकतृत्वाचे वर्णन करताना हिरा बनसोडे म्हणतात की,

"हत्ती सारखी धडक मारून
तु ठोठवलेस काळारामाचे मंदिर
मंदिराचे दगड गदगद हालले
धर्माच्या पवित्र नावावर
देव यांनी कलेला गुलाम केलेत"...४

कवियत्रीने भारतीय समाज व्यवस्थेतील वास्तव यातून व्यक्त केलेल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकराना चवदार तळयाचा सत्याग्रह,काळाराम मंदिर प्रवेश या दोन्ही घटनेतून मानवमुक्तीचा व मानवी स्वांतत्र्यासाठी केलेले कार्य कांतीकारक स्वरूपाचे होते. ज्या धर्मांध प्रवृत्तीनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराना विरोध केला तेच लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होत आहेत हे पाहुन कवियत्रीला आश्चर्य वाटत आहेत. कारण धर्माच्या नावावर धर्मांध कर्मठ प्रवृत्तीनी देवाला गुलाम केलेले आहेत हे सामाजिक वास्तव कवियत्रीने अत्यंत परखडपणे वास्तववादी भूमिकेतून व्यक्त केलेले आहेत. दलित साहित्यातून मानवतावादी व समताधिष्ठीत समाज व्यवस्था निर्माण होण्यासाठी मनोभूमिका स्पष्ट झाल्याचे दिसून येते. जातीव्यवस्थेचा अंत होवून विश्वबंधुत्वाची जाणीव निर्माण करण्याची जाणीवा दलित साहित्यातून व्यक्त झालेल्या आहेत. त्याविषयी डॉ. कृष्णा किरवले म्हणतात की, "मानवी मूल्याची गरज सार्वकालीन आहे.म्हणून प्राचीन काळी धर्मिक तत्वाव्दारे त्यांचे नियंत्रण करण्याचा प्रत्यय झाला बरोबरच पुढील काळात तत्ववेत्यांनी त्यांचे सिध्दात केले त्यातून विविध तत्वज्ञानाचा उदय झाला"......५ वरील मतातून दलित साहित्यातील मानवीमूल्याचे व तत्वज्ञानाचे स्वरूप स्पष्ट होते.डॉ.किशोर सानप म्हणतात की, "काळ बदलतो युग बदलतो विषमतेची सुत्रे ही बदलतात ,आधुनिक युग आले नंतर गोल्बल युग आले जगातून किंबहुना भारतीय समाजातून चार्तुवर्ण्यव्यवस्था विषमतामूलक धर्मव्यवस्था सर्वहारचे शोषण करणारी व्यवस्था कुठे बदल्याचे चित्र आहे. युग बदलते व्यवस्था कायमच आहे".....६ मराठी साहित्यातील श्रेष्ठ समीक्षक डॉ. किशोर सानप यानी काळ बदला तरी किंवा युग बदले तरी चार्तुवर्ण्यव्यवस्था, धर्मव्यवस्थेतील कर्मठ वर्ण,परंपरा नष्ठ होत नाहीत.विषमतामूलक विचारधारा समाजात निर्माण होत असल्यामुळे मानवीमूल्याची पायमल्ली कालपरत्वे होत आहे. म्हणून दलित साहित्यीकानी स्वांतत्र्य,समता,बंधुत्वाची जाणीवा साहित्यकृतीतून अभिव्यक्त केलेले आहेत दलित साहित्याविषयी डॉ. सदा क-हाडे म्हणतात की, "दलित साहित्य हे परिवर्तनवादी साहित्य आहे. विद्रोही साहित्य आहे. तसेच ते पुरोगामी साहित्य ही आहे."......७ दलित साहित्य हे जातिव्यवस्थे विरूध्द कर्मठ असा धर्मव्यवस्थेविरूध्द बंड करणारी चळवळ असल्यामुळे दलित साहित्य परिवर्तनवादी आणि समताधिष्ठीत समाज निर्माती करण्याबरोबरचं विश्वबंधुत्वाची जाणीव करून देणारे साहित्य आहे. हे आपल्याला नाकरता येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या वर्णव्यवस्था विषयी डॉ.सदा क-हाड म्हणतात की, "ज्यात वर्ग (Class) वर्ण ( Caste) अशा पेच (Creed) नाही अशी सामाजिक लोकशाहीच हवी जातीव्यवस्थेचे निर्मुलन केल्याशिवाय सामाजिक लोकशाही प्रस्थापित होणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे मत होते, म्हणुन त्यांच्या तत्वज्ञानात वर्गलढयापेक्षा ही वर्णलढयावर आधिक होता".....८ वरील मतातून डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे अभिप्रेत असलेल्या सामाजिक लोकशाहीची जाणीव स्पष्ट होते.दलित साहित्य हे डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या प्रेरणातून निर्माण झालेले आहे.विषमतामूलक धर्मव्यवस्था,जातीव्यवस्था आणि लिंगव्यवस्थेमुळे दलित समाज जीवनाची शोकांतिका झाली आहे. विवेकवादी, विज्ञानवादी, मानवतावादी, समताधिष्ठीत समाजव्यवस्था करणारी लोकशाहीमुल्याचे रक्षण करणारी विचारधारा भारतीय समाजव्यवस्थेत निर्माण करण्याची जाणीवा दलित साहित्यातून व्यक्त झालेले आहे दलित साहित्य हे दलित समाजाच्या संघर्षाची यशोगाथा आहे. तसेच दलित साहित्य हे कर्मठ धर्मव्यवस्थे विरूध्द,जातीव्यवस्थे विरूध्द, वंशवादीमनोवृती आणि विषमतामुलक व्यवस्थेविरूध्दची सघर्षमय जीवनगाथा आहे. हे आपल्याला नाकारता येत नाही.

संदर्भ सुची:

१) डॉ. गंगाधर पानतावणे लोकराज्य मासिक (जून, जूलै 2011,) वर्ष 63 अंक 3 व 4 संपादक विजय नाहटा पान क्र. 15

2) त्रतैव- पान क्र 17

3) हिरा बनसोडे- फिर्याद (कवितासंग्रह) कैलाश प्र. औरंगाबाद. पान क्र. 61

4) त्रतैव- पान क्र 26

5) डॉ. कृष्णा किरवले- दलित चळवळ आणि साहित्य प्र प्रतिमा पुणे (जून 1996) पान क्र. 14

6) डॉ. किशोर सानप- अक्षरपेरणी (त्रैमासिक) अंक 1014 (जून 2007) संपादक विजय लेले पान क्र 72

7) डॉ. सदा क-हाडे- साहित्यविश्लेषण- स्वरूप प्र. औरंगाबाद (जाने 1999) पान क्र. 61

8) त्रतैव- पान क्र 62, 63